महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, राणीचा बाग, पुणे - ४११००१

दूरध्वनी -०२०-२६३३०८५४
फॅक्स - ०२०-२६३६००२६
ई-मेल trti.mah@nic.in

# जाहिरात नमुना

वृत्तपत्र प्रसिद्धी करिता आकारमान (१२ सेमी * १० सेमी)

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

### आदिवासी विकास विभाग, म.रा. पुणे

**पुणे येथील कार्यालयात कंत्राटी पध्दतीने प्रकल्प संचालक (०१), प्रकल्प सहाय्यक (०१), प्रशासकीय अधिकारी (०१) भरतीबाबत जाहिरात**

आदिवासी विकास विभागामार्फत आदिम जमातीसाठी सुरु करण्यात आलेले कार्यक्रम, योजनांचा नियमित आढावा घेणे, योजना आणि कार्यक्रम यांची नियोजन केल्याप्रमाणे अंमलबजावणी होत असल्याची खात्री करणे, अंमलबजावणीमध्ये आलेल्या अडथळ्यांचे निराकरण करणे, त्यांचे संनियंत्रण व मुल्यमापन करणे, नवीन योजनांबाबत संशोधन करणे ही व यासारखी अन्य कार्य पार पाडणे या मुख्य उद्देशाने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रमांतर्गत "Creation of PVTG cell for targeted intervention" ही योजना दोन वर्षांसाठी राबविण्यात येत आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे कार्यालय स्तरावर या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपातील (कंत्राटी पध्दतीने) भरती करण्यात येत आहे. त्यासाठी अर्हता पात्र अनुसूचित जमातीमधील आदिम जमातीच्या (कातकरी, कोलाम व माडिया) उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबत सविस्तर माहितीकरिता व अर्जाच्या नमुन्या बाबत अधिकृत संकेतस्थळ www.trti.maharashtra.gov.in/index.php/en/ ला भेट द्यावी. पात्रता धारक उमेदवार यांचे अर्हतेनुसार निवड करण्याचे अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक : २०.०४.२०२१**
**वार : मंगळवार वेळ : संध्याकाळी ०६.०० पर्यंत**
**स्थळ : आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८ क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे ४११०१**
**ई मेल व्दारे : trti.pvtg@gmail.com**

(पवनीत कौर भा.प्र.से.)
आयुक्त

Scanned with CamScanner